# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३६६-२२** **दिनांक ३०/११/२०२२**

## मोक्का सारख्या गंभीर गुन्हयामध्ये १० वर्षे शिक्षा भोगुन सुटलेल्या आरोपीस मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने केले अग्नीशस्त्रासह अटक.

मिरा-भाईन्दर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विशेषत: वसई-विरार परिसरात अवैध शस्त्रांवर आळा बसणे करिता वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी मार्गदर्शनात्मक सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार गोपनीय माहिती काढून कर्तव्य करित असतांना सपोनि दत्तात्रय सरक, पोहवा. शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे यांना एक इसमाकडे अग्नीशत्र असून तो नालासोपारा पुर्व, रशिद कम्पाउन्ड याठिकाणी येणार असल्याची बातमी मिळाली होती. सदर बातमीचे अनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण पथकाने सापळा रचुन दिनांक २९.११.२०२२ रोजी इसम नामे अजय बलराम मंडल, वय-३५ वर्षे, राठि. रुम नं.१८, भागवत चाळ, भागवत टेकडी, धानीव बाग, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर मुळ राह. मु. पतसपुर, ता. नारायणपुर, जि. बाकुरा, राज्य पश्चिम बंगाल यास शिताफीने ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात विनापरवाना ०१ गावठी बनावटीचा कट्टा, ०८ जिवंत पितळी धातुचे राउंड / काडतुसे व रोख रक्कम असा एकुण ४१,३००/- रुपये किंमतीचा माल मिळुन आला. तसेच त्याने पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) मिरा-भाईंदर वसई-विरार यांचे प्राणघातक हत्यारे जवळ बाळगण्यास मनाई आदेशाचा भंग केल्याने त्यास पुढील कायदेशीर कारवाई कामी पेल्हार पोस्टे यांचे ताब्यात देवुन त्याचे विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं I१०१२/२०२२ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), (३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येवून त्यास अटक करण्यात आली आहे.

अजय बलराम मंडल हा सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरुध्द यापुर्वी गुन्हे दाखल असून त्याने एम.सी.ओ.सी. ॲक्ट अन्वये १० वर्षे कारावास भोगलेला आहे.

१. डी.सी.बी. सी.आय.डी. मुंबई गुरनं.१८/२०११ आर्म ॲक्ट – ३,२५ प्रमाणे.
२. एल.टी.मार्ग पोस्टे. मुंबई गुरनं.२९५/२०११ भादविसक - ३९५, ३९२, ३९७, ३४२, ४५२,३४ सह आर्म ॲक्ट ३,४,२५, म.पो.ॲक्ट ३७ (१),१३५ प्रमाणे (एम.सी.ओ.सी. ॲक्ट ३-१,II, ३-२,३-४ )
३. एल.टी.मार्ग पोस्टे. मुंबई गुरनं.२८१/२०१२ भादविसक - ३९५, ३९२, ३९७, ३९४, ४५२,३४ प्रमाणे.
४. आर. ए. के. मार्ग पोस्टे गुरनं. १८१/२००६ भादविसक-३३२,३५३,३४ प्रमाणे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) व श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. राहुल राख, सपोनि/दत्तात्रय सरक, सपोनि/नितीन बेंद्रे, पोउनि/ चंद्रकांत पोशिरकर, पोहवा/शिवा पाटील, गोविंद केंद्रे, राजाराम काळे ,संग्राम गायकवाड, आसीफ मुल्ला, मनोहर तावरे, अनिल नांगरे, सुनिल कुडवे यांनी केलेली आहे.


मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण कक्ष